ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारी प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख २४ एप्रिल, १९५७ | अंक १७

## विविध माहिती

**आशिया संबंधींचा ज्ञानकोष—** संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शैक्षणिक व शास्त्रीय उपसंघटनेतर्फे आशिआंतील देशांसंबंधीं एक ज्ञानकोष तयार करण्यांत येणार आहे. पाश्चिमात्य देशांत पौर्वात्य देशांसंबंधी अधिक माहिती प्रसृत करण्यासाठी हा उपक्रम करण्यांत येत आहे. ह्याविषयींच्या सल्लागारसमितीचे अध्यक्ष श्री. के. एम्. पण्णीकर आहेत.

**डॉ. आंबेडकरांचें स्मारक—** भारतीय राज्यघटनेचे विधाते डॉ. आंबेडकर ह्यांची जयंती साजरी करण्याचा समारंभ दिल्ली येथें झाला. दिल्ली येथें डॉ. आंबेडकर ह्यांचा संपूर्ण पुतळा त्यांचें स्मारक म्हणून उभारण्यांत आला. पुतळा संगमरवरी दगडाचा असून तो 'आंबेडकर भुवना' समोर उभारण्यांत आला आहे.

**मल्याळी भाषेंतील ज्ञानकोष—** मल्याळी भाषेंतील पहिल्याच ज्ञानकोषाचा प्रथमखंड नुकताच प्रसिद्ध करण्यांत आला आहे. पहिला खंड महात्मा गांधींना अर्पण करण्यांत आला आहे. दरवर्षी एक, ह्याप्रमाणें आणखी सहा खंड प्रकाशित करण्यांत यावयाचे आहेत. प्रत्येक खंडाची पृष्ठसंख्या १,००० असेल.

**सालरजंग चित्रसंग्रह—** हैदराबाद येथील सालरजंग चित्रसंग्रहाची पुनर्घटना करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठीं श्री. अनिल रॉय ह्या तज्ज्ञाची नेमणूक करण्यांत आली आहे. अमेरिकेंतील चित्रसंग्रहांची व्यवस्था कशी ठेवली जाते त्याचा अभ्यास करून श्री. रॉय आलेले आहेत.

**नगरपित्यांना टेलिफोनची सोय—** बंगलोरच्या म्युनिसिपल कॉर्पोरेशननें नगरपित्यांना टेलिफोनची सोय करून देण्यासाठी १०,००० रुपयांची तरतूद केली आहे. प्रत्येक नगरपित्याला टेलिफोनचें मासिक भाडें रुपये १० आणि त्यावरून बोलण्यासाठी ५ रुपयेपर्यंतचा आकार देण्यांत येणार आहे.

**पांबन् येथें नवा पूल—** दक्षिण भारतामधील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र जें रामेश्वर त्याला जाण्यासाठी भारताच्या मुख्य भूमीपासून थेट रामेश्वरपर्यंत नवा पूल बांधण्यांत येणार आहे. सध्यां रामेश्वरला फक्त पांबन् येथील रेल्वेच्या पुलावरूनच जावें लागतें.

**कोचीन बंदराचा अधिक उपयोग—** म्हैसूर राज्यांतील अशुद्ध लोखंड व मँगेनीझ ह्या धातूंची परदेशीं निर्यात करण्यासाठी आतांपर्यंत मद्रास बंदराचा उपयोग करण्यांत येत असे. आतां ह्या कामासाठी कोचीनच्या बंदराचा उपयोग करण्याचें भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें ठरविलें आहे. मजूर संघटनांकडून बंदराचा अधिक उपयोग करून घेण्याच्या मागण्या करण्यांत आल्या होत्या.

**आंध्रमधील मच्छीमारीचा धंदा—** आंध्र राज्य सरकारनें परदेशीय तज्ज्ञांचें साह्य घेऊन राज्यांतील मच्छीमारीच्या धंद्याची वाढ करण्याचें ठरविलें आहे. हैदराबाद शहरापासून १०० मैलांवर निझामसागर म्हणून एक मोठा तलाव आहे. ह्या तलावांत माशांची पैदास करून तेथें आधुनिक पद्धतीचें मच्छीमारी केंद्र उघडण्याचा विचार करण्यांत येत आहे.

**अगदीं जरूर तरच झाडें पाडा—** भारतांत ठिकठिकाणीं फारशी जरूर नसतांना झाडें पाडलीं जातात ह्याबद्दल पंतप्रधान नेहरू ह्यांनीं चिंता व्यक्त केली आहे. भारत सरकारकडून ह्या बाबतींत एक पत्रक राज्यसरकारांना पाठविण्यांत आलें असून त्यांत अनिवार्य असेल तरच वृक्षराजी पाडण्यांत यावी अशी सूचना केली आहे.

**ऐक्य साधण्यासाठी चित्रपट—** राज्यपुनर्रचनेनंतर अस्तित्वांत आलेल्या नव्या मध्यप्रदेशांत पूर्वीच्या अ, ब, क राज्यांतील प्रदेश सामील करण्यांत आलेले आहेत. नव्या राज्याचीं भावनात्मक एकता साधण्यासाठी भारत सरकारच्या चित्रपटखात्यातर्फे एक बोलपट घेण्यांत यावा अशी सूचना राज्य सरकारनें केली आहे.

**चंबळा नदीवरील धरण—** चंबळा नदीवर बांधण्यांत येत असलेल्या धरणासाठी भारत सरकारनें राजस्थान सरकारला ४० लाख रुपये व मध्यप्रदेश सरकारला २५० लाख रुपये असें कर्ज मंजूर केलें आहे. ह्या कामासाठी राजस्थानला आतांपर्यंत २२७ लाख व मध्यप्रदेशाला ४५५ लाख रुपये देण्यांत आले आहेत.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## एका आफ्रिकन बँकेची उद्बोधक कहाणी

### कस्पटासमान शेअरची किंमत २० शिलिंग झाली !

पूर्वनायजेरियाचे पंतप्रधान डॉ. अझिकेवी व आफ्रिकन कॉंटिनेंटल बँक ह्यांचा दृढ संबंध कसा होता आणि त्या बँकेंत ईस्टर्न रिजन फायनान्स कॉर्पोरेशननें कोणत्या परिस्थितींत रकमा गुंतविल्या, ह्याची चौकशी करून रिपोर्ट करण्यासाठी एक चौकशी-कमिशन नुकतेंच नेमण्यांत आलें होतें. त्या कमिशनचा रिपोर्ट मोठा उद्बोधक आहे.

१९४४ मध्यें डॉ. अझिकेवी ह्यांनीं टिनुबु प्रॉपर्टीज लि. नांवाची कंपनी २५० पौंडांस विकत घेतली. त्यावेळीं कंपनी-जवळ कांहींच जिंदगी नव्हती असें म्हटलें तरी चालेल. कंपनीचें नांव पुढें बदलून तें टिनुबु बँक लि. असें करण्यांत आलें, व तिचें अधिकृत भांडवल ५,००० पौंडांवर नेण्यांत आलें. १९४७ मध्यें, बँकेचें नांव पुनः बदलून तें आफ्रिकन कॉंटिनेंटल बँक लि. असें रुबाबदार ठेवण्यांत आलें. त्यानंतरच्या दोन वर्षांत बँकेचें अधिकृत भांडवल २,५०,००० पौंड करण्यांत आलें. मे, १९५२ मध्यें एक बँकिंग ऑर्डिनन्स अंमलांत आला, तेव्हां बँकेनें लायसेन्ससाठी अर्ज केला. ऑक्टोबर, १९५३ मध्यें तिच्या निदर्शनास असें आणण्यांत आलें, कीं बँकेनें दाखल केलेल्या तक्त्याप्रमाणें, कॅश रिझर्व्हजचें देण्याशीं प्रमाण ९·८% होतें; त्यानंतरच्या सहा महिन्यांत तें ३०% करण्यांत आलें पाहिजे. बँकेच्या इन्व्हेस्टमेंटच्या चालू दरानें होणाऱ्या किंमती-बाबत पुरेसा तपशीलहि मागविण्यांत आला. मार्च, १९५४ मध्यें बँकेच्या जनरल मॅनेजरनें बँकेच्या सर्व म्हणजे १४ शाखांना सर्क्युलर पाठवून, बँकेच्या हिशेबाचे वार्षिक तक्ते तयार करण्याची वेळ जवळ येत आहे; ३१ मार्च रोजीं भरपूर रोख रकम असावयास हवी म्हणजे बँकिंग ऑर्डिनन्सची अट निम्या अंशीं तरी पार पडूं शकेल; शाखाधिकाऱ्यांनीं घरोघर जाऊन रोख रकमेच्या ठेवी गोळा कराव्यात; श्रीमंत गिऱ्हाइकांना ३१ मार्च रोजीं एका दिवसाकरतां का होईना, मोठ्या रकमा ठेव म्हणून ठेवण्यास उद्युक्त करावें, वगैरे सूचना केल्या होत्या. ३१ मार्च, १९५४ हा बँकेच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा दिवस होता; कारण बँकांना लायसेन्सशिवाय कारभार चालू ठेवण्याची सवलत १९५५ मध्यें संपत होती व ३१ मार्च, १९५४ रोजींच्या ताळेबंदावरून लायसेन्स मिळणें न मिळणेंबाबत निर्णय केला जाणार होता.

आफ्रिकन कॉंटिनेंटल बँक ही बँक झिक गटाच्या उलाढालींना पैसा पुरविण्यासाठीच मुख्यतः काढलेली असून, बँकिंगच्या व्यवसायाला धरून जनतेचें हितहि पाहिलें जाईल, असें डॉ. अझिकेवी ह्यांनीं अनेकवार बोलून दाखविलें होतें. झिक गटांतील कंपन्या बँकेच्या भागीदार होत्या आणि डॉ. अझिकेवी ह्यांना निर्णायक अधिकार मिळेल इतका त्यांचा त्या कंपन्यांत हात होता. ते स्वतः व त्यांची कुटुंबीय मंडळी ह्यांनीं बँकेचे बरेच भाग घेतलेले होते. ह्या भागांवरील येणें रकमा मागविलेल्या नव्हत्या; इतर बहुतेक भागदारांकडून मात्र भागांची सर्व रक्कम वसूल करण्यांत आलेली होती. भागाची कितीहि रकम वसूल झालेली असो, प्रत्येक भागागणिक एक मत देण्याचा भागदाराला अधिकार होता.

डॉ. अझिकेवी ह्यांची ३० जानेवारी, १९५४ रोजीं मंत्रि म्हणून नेमणूक झाली तेव्हां त्यांनीं बँकेच्या चेअरमनपदाचा व गव्हर्निंग डायरेक्टरपदाचा, त्याचप्रमाणें झिक गटांतील कंपन्यांच्या डायरेक्टर पदाचा राजीनामा दिला. १ ऑक्टोबर, १९५४ रोजीं नायजेरियाची नवी राज्यघटना अमलांत आली व डॉ. अझिकेवी हे पूर्व नायजीरियाचे मुख्य मंत्री झाले. ज्या पक्षाचे ते नेते होते, त्या पक्षाच्या निवड-णुकीच्या जाहीरनाम्यांत बँकिंगच्या वाढीवर भर देण्यांत आला होता व त्या दिशेनें पहिलें पाऊल म्हणून सरकारनें एक फिनॅन्स कॉर्पोरेशन अस्तित्वांत आणलें. ह्या कॉर्पोरेशननें आपले जवळील रकमा आफ्रिकन कॉंटिनेंटल बँकेंत ठेवण्यास प्रारंभ केला; त्याचप्रमाणें ८,००,००० पौंड एवढी मोठी रकम त्यानें बँकेंत गुंतविली. ही रकम गुंतविण्यांत आली, तेव्हां बँकेची परिस्थिति दिवाळखोरीची होती, तिला खूपच व्यवहारांत तोटा आलेला होता आणि पूर्वीच्या बुडीत कर्जाची तरतूद तिनें केलेली नव्हती. त्यामुळें, बँकेचे भाग खरोखरच कस्पटासमान झाले होते. बँक आणि फिनॅन्स कॉर्पोरेशन ह्यांच्यांतील करारानंतर बँकेच्या भागाची किंमत प्रत्येकीं १० शि. १४ पे. पर्यंत वाढली, आणि करारांतील ३ रें कलम विचारांत घेतलें तर ती प्रत्येक भागास २० शिलिंग एवढी झाली !

---

## बँकेच्या जाहिरातीची उत्क्रांति

### टेलिव्हिजनवरील प्रचारापर्यंत मजल

जाहिरातीच्या कलेंत आतां खूपच सुधारणा झाली आहे आणि ब्रिटिश बँकासुद्धां आपल्या जाहिरातींत नाविन्य आणूं लागल्या आहेत. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी, बँकांच्या जाहिरातींत बँकेचें नांव व तिच्या भांडवलाची रचना ह्यापलीकडे फारसें कांहींच आढळत नसे. परंतु हल्लींच्या चढाओढीच्या काळांत बँकांनाहि जाहिरातीचे बाबतींत अधिक जागरूकता दाखविणें अगत्याचें झालें आहे. ह्याचा अनुभव आपणांस येथेंहि येत आहे. मिडलंड बँकेच्या जाहिरातींची उत्क्रांति कशी कशी होत गेली हें दाखविणारी पुस्तिका तिनें नुकतीच प्रसिद्ध केली आहे. पूर्वीच्या मानानें आतांचा तिचा प्रचार कितीतरी आकर्षक होत आहे. बँकेचा वार्षिक अहवालाहि आतां आकर्षक रीतीनें छापण्यांत येतो. बँकेनें प्रसिद्ध केलेल्या "प्रेसेंटिंग दि मिडलंड बँक" ह्या पुस्तिकेची रचनाहि उत्कृष्ट प्रतीची आहे. ह्या पुस्तिकेच्या प्रकाशनानंतर, गेल्या डिसेंबरमध्यें, मिडलंड बँकेनें "देणगीचे चेक" (मिडलंड बँक गिफ्ट चेक्स) सुरू केले, त्याची जाहिरात ब्रिटिश टेलिव्हिजनवर केली. ब्रिटिश बँकेनें जाहिरातीसाठी व प्रचारासाठी टेलिव्हिजनचा उपयोग केल्याचा हा पहिलाच प्रसंग होय.

---

## फ्रान्सच्या बँकरेटमध्यें वाढ

फ्रेंच बँकरेट ११ एप्रिल १९५७ पासून ३% चा ४% करण्यांत आला. ह्यापूर्वीचा बदल २ डिसेंबर, १९५४ रोजीं करण्यांत आला होता. त्यावेळीं बँकरेट ३·२५ चा ३% केला गेला. सुमारें २ वर्षें तो सबंध युरोपांत कमी होता.

---

## म्युनिच येथें हिंदीचा प्रसार

म्युनिच (जर्मनी) येथें सध्यां ३० जर्मन स्त्री-पुरुष हिंदी भाषा शिकत आहेत. म्युनिच विद्यापीठांत वैद्यकी शिकत असलेले, बनारसचे श्री. पी. एस्. राय शर्मा हे हिंदी शिक्षकाचें काम करतात.

# अर्थ

बुधवार, ता. २४ एप्रिल, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अणुशास्त्रज्ञांच्या असहकाराचे परिणाम

पश्चिम जर्मनीमधील १८ उच्च प्रतीच्या अणुशास्त्रज्ञांनीं अणुस्फोटाच्या अस्त्रांच्या निर्मितीशीं असहकार करणार असल्याचें एक पत्रक काढून जाहीर केलें आहे. त्यांनीं जाहीर केलेल्या भूमिकेमुळें खुद्द जर्मनींत तर खळबळ उडालीच आहे. पण त्यांच्या घोषणेचे परिणाम आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत उठण्याचाहि बराच संभव आहे. अणुस्फोटाच्या अस्त्रांबद्दल दिवंगत शास्त्रज्ञ अलबर्ट आइनस्टाइन ह्यांनींहि जगाला धोक्याचा इषारा दिलेला होता. जर्मनीमध्यें शास्त्रज्ञ व विद्वान ह्यांना जनतेमध्यें विशेष प्रकारचा मान देण्याची परंपरा फार जुनी आहे. त्यामुळें त्यांच्या असहकाराच्या घोषणेचा लोकांवर फार मोठा परिणाम होणें स्वाभाविक होतें. पण त्याहीपेक्षा अधिक खळबळाट जर्मन सरकारमध्यें पसरला आहे. कारण, शास्त्रज्ञांच्या सहकार्याशिवाय पश्चिम जर्मनींत अणुशस्त्र सज्जित करतां येणें अशक्य होऊन बसणार आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मन शास्त्रज्ञांविरुद्ध हिटलरच्या, शास्त्रांचा दुरुपयोग करण्याच्या वृत्तीला वेळींच विरोध न केल्याबद्दल टीका करण्यांत आली होती. हा आरोप पुन्हां करण्यांत येऊं नये म्हणून शास्त्रज्ञ जागे झालेले दिसतात. शास्त्रज्ञांच्या ह्या वृत्तीमुळें जर्मनीचे चॅन्सेलर कॉनरॅड अडेनॉअर रागावलेले आहेत. शास्त्रज्ञांना आपण काय करीत आहों ह्याचें भान राहिलेलें नाहीं, असें त्यांचें म्हणणें आहे. उलटपक्षीं, शास्त्रज्ञ म्हणतात कीं, जर्मनीला पुरविण्यांत येणारीं अणुशस्त्रें केवळ डावपेंचाच्या छोट्या लढाईत वापरण्याइतकीं लहान राहाणें शक्य नाहीं. तीं केव्हांहि प्रचंड स्वरूप धारण करतील.

---

## घरांच्या टंचाईबद्दलचा अहवाल

संयुक्त राष्ट्रसंघटनेनें रहात्या घरांच्या टंचाईबद्दलचा आपला अहवाल इकॉनॉमिक व सोशल कौन्सिलला सादर केला आहे. ह्या अहवालांत भारतामधील रहात्या घरांच्या टंचाईबद्दल पुढील-प्रमाणें माहिती दिली आहे. आशिआ खंडांत दारिद्र्याचा प्रश्न हा पुरातन आहे. युद्धकालांत व त्यानंतरच्या घटनांनीं ह्या प्रश्नाला नुसता हातसुद्धां लागलेला नाहीं. रहात्या घरांचा प्रश्न तर उलट अधिकच तीव्र झाला आहे. कारण, खेड्यांतील लोक शहरांत येऊन शहरांची लोकसंख्या वाढली आहे व वाढत आहे. भारताची गोष्ट घेतली तर असें दिसून येतें कीं, १९६१ च्या सुमारास भारतांत ५२ लाख घरांची टंचाई फक्त शहरांचा विचार केला तरी भासेल. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत भारतांत १५ लाख घरें बांधण्यांत आलीं. तरीपण घरांची टंचाई तशीच चालू आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत २१ लाख घरें बांधण्याचें ठरविण्यांत आलें आहे. परिस्थिति अशी आहे कीं भारतामधील फारच थोड्या लोकांना आपल्या मालकीचीं घरें बांधणें शक्य आहे. भारतांत घरें बांधण्यासाठी सुमारें १,००० डॉलर्स खर्च येतो. पण इतकी रक्कम खर्चून घर बांधण्याची ऐपत खेडेगांवांतील फक्त ५ टक्के लोकांना व शहरांतील फक्त १२ टक्के लोकांनाच असते. भारतामधील शहरांतून लोकसंख्येची गर्दी झालेली आहे. मुंबईतील कामगारविभागांत दर दरमाणसामागें सरासरी अवघी २७ चौरस फूट जागा उपलब्ध आहे. आणि इतकेंहि करून एकचतुर्थांश लोकांनाच राहती जागा मिळालेली आहे.

---

## आंध्र राज्यांत कागदाचा नवा कारखाना

आंध्र राज्यांत निझामाबाद जिल्ह्यांत वृत्तपत्रांना लागणारा कागद तयार करण्याचा नवा कारखाना उभारण्यांत येणार आहे. कारखान्याची उत्पादनक्षमता नेपा ह्या कारखान्याइतकीच राहणार आहे व तो सार्वजनिक मालकीच्या विभागांत समाविष्ट केला जाणार आहे. भारत सरकारचे भारी उद्योगधंद्याचे मंत्री श्री. मनुभाई शहा कारखान्यांच्या जागेची पहाणी करण्यासाठी नुकतेच आंध्र राज्यांत जाऊन आले. कागद तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालासाठीं साखरकारखान्यांतील उसाच्या चिपाडांचा उपयोग करण्यांत येणार आहे. उसाच्या चिपाडाचा कागदाच्या निर्मितीसाठी उपयोग करणारा हा पहिलाच कारखाना होईल कारखान्यासाठी ५ कोटी रुपयांचें भांडवल लागेल आणि त्यामधून दरसाल ३०,००० टन कागद निर्माण होऊं शकेल. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर भारतामधील कागदाची मागणी दरसाल १,२०,००० टनांच्या आसपास असेल असा अंदाज करण्यांत आला आहे. आंध्र राज्यांतील हा दुसरा कारखाना सुरू झाला म्हणजे देशांतील वृत्तपत्रांना लागणाऱ्या कागदाचें उत्पादन ६० लाख टनांपर्यंत येईल. हा कारखाना उत्पादन करूं लागला म्हणजे भारताच्या परदेशीय हुंडणावळी-च्या खर्चांत सालीना २·५ कोटी रुपयांची बचत होईल. कार-खान्याच्या तांत्रिक बाजूची सिद्धता जर्मन तज्ज्ञांच्या साह्यानें करण्यांत येणार आहे. निझाम शुगर फॅक्टरी ह्या कारखान्यांतून उसाच्या कोरड्या चिपाडाचा भरपूर पुरवठा कागदाच्या कार-खान्यास होईल. हा कारखाना आशिआंतील सर्वांत मोठा कारखाना होईल. त्यामुळें दरसाल ८५,००० टन चिपाडें कागदाच्या निर्मितीसाठीं मिळतील.

---

**पगारी रजा घेतलीच पाहिजे**—न्यूयॉर्कमधील एका कापडाच्या गिरणींतील वरिष्ठ अधिकाऱ्यांना प्रत्येक सहाव्या आठवड्यानंतर एक आठवडा पगारी रजा सक्तीनें घ्यावी लागेल. हृदयविकार व आंतड्याचे विकार ह्यांच्यापासून त्यांचा बचाव करण्यासाठीं त्यांचेवर ही सक्ती केली आहे.

**ब्रह्मदेशाकडून तांदुळाची खरेदी**—भारत सरकार आणि ब्रह्मदेशचें सरकार ह्याच्या दरम्यान तांदुळाच्या खरेदीबद्दल करार करण्यांत आला आहे. भारतानें ब्रह्मदेशाकडून ५ लाख टन तांदूळ खरेदी करण्याचें ठरविलें आहे. तांदूळ दोन हप्त्यांत भारताला पाठविला जाईल. त्याची किंमत १·६ कोटी रुपये असेल.

## दि सांगली बँक लि.

वरील बँकेस मागील वर्षाचा शिल्की नफा ( १,५३८ रु. ) धरून, १९५६ मध्यें १,३४,७६२ रु. नफा झाला. डायरेक्टरांनीं खालीलप्रमाणें विनियोग केला आहे:—

| | |
|---|---|
| १ जनरल रिझर्व्ह | रु. १६,०००–०–० |
| २ इन्कमटॅक्सची तरतूद | रु. ४५,०००–०–० |
| ३ बुडीत फंड व संशयित कर्ज | रु. १८,७५८–०–० |
| एकूण | रु. ७९,७५८–०–० |

त्यानंतर ५५,००५ रु. नफा उरतो. त्यांतून करमाफ १२% डिव्हिडंड देण्यांत येऊन पुढील हिशेबांत १,००५ रु. नफा ठेवण्यांत आला.

१९५६ मध्यें बँकेस बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या २२ ( १ ) कलमास आवश्यक असलेला रिझर्व्ह बँकेचा लायसेन्स मिळाला, ही महत्त्वाची घटना होय. बँकेच्या व्यवहारांत पूर्वीप्रमाणें वाढ होत आहे. ६–१२–१९५६ रोजीं बँकेनें सांगली येथें ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केटांत आपली शाखा उघडली.

बँकेचें वसूल भांडवल ४,५०,००० रु. असून रिझर्व्ह व इतर फंड ६,५७,००० रु. चे आहेत. ठेवी १,४५,९९,४४४ रुपयांच्या आहेत. बँकेनें ५५½ लक्ष रुपयांची इन्व्हेस्टमेंट केली असून ८७,८८,०७८ रु. चीं कर्जें दिलेलीं आहेत.

( चेअरमन : श्री. एम्. ए. शेख, आय. ए. एस्., कलेक्टर, द. सातारा जिल्हा [ अधिकारपरत्वें, मुंबई सरकारनें नियुक्त ] मॅनेजर : श्री. एम्. के. गुप्ते एम्. ए., एलएल्. बी., सी. ए. आय. आय. बी. )

### रशिआंतील आर्थिक प्रगतीचा वेग मंदावला

इकॉनॉमिक कमिशन फॉर युरोप ह्या संघटनेनें गेल्या वर्षाचा आपला अहवाल प्रसिद्ध केला आहे. अहवालांत रशिआ व पूर्व युरोपांतील कम्युनिस्ट देश ह्यांच्यामधील आर्थिक घडामोडींचा आढावा घेण्यांत आला असून अखेर असा निष्कर्ष काढण्यांत आला आहे कीं, ह्या देशांमधील आर्थिक प्रगतीचा वेग मंदावला आहे. तथापि रशिआंत पडीक जमिनी लागवडीस आणण्याच्या कार्यक्रमांत चांगलें यश आल्यानें धान्याची पैदास विपूल प्रमाणांत झाली. पूर्व युरोपांतील देशांत मात्र खराब हवामानामुळें पिकें चांगलीं आलीं नाहींत. उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत गेलें वर्ष फारसें समाधानकारक गेलें नाहीं त्यामुळें चालू वर्षी बांधकाम चालू असलेले कारखाने पूर्ण करण्याकडे आधीं लक्ष देण्यांत येत आहे. त्याचबरोबर कोळशाच्या खाणी व विजेचे उत्पादन ह्यांच्याकडेहि अधिक लक्ष पुरविण्यांत येत आहे. गेल्या वर्षीच्या दुसऱ्या अर्धांत जळणाच्या टंचाईनें बरेंच उग्र स्वरूप धारण केलें होतें. त्यांतच रुमेनिआ व हंगेरी ह्या देशांतील तेलाच्या उत्पादनांत घट झाली. रशिआ व पूर्व युरोप ह्या देशांत जळण व कच्चा माल ह्यांचा पुरवठा अपुरा पडला. त्यामुळें १९५७ सालच्या त्यांच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. रशिआ सोडून इतर देशांत भांडवलाच्या गुंतवणुकीचीं जीं उद्दिष्टें जाहीर करण्यांत आलीं होतीं तीं पुरीं करतां आलीं नाहींत. पोलंड, बल्गेरिआ व हंगेरी ह्या देशांत नव्या भांडवलाची गुंतवणूक पूर्वींच्या मानानें कमी प्रमाणांत झाली. सर्वच देशांतील आर्थिक नियोजनावर राजकीय घडामोडींचा विपरीत परिणाम झाला.

### १० वर्षें मुदतीचीं ट्रे. से. डि. सर्टिफिकिटें गहाण टाकण्यास परवानगी

१० वर्षें मुदतीचीं ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिट सर्टिफिकिटें शेड्यूल्ड बँकेकडे किंवा सहकारी बँकेकडे गहाण टाकून त्यावर कर्ज काढण्यास भारत सरकारनें मोकळीक दिली आहे. १ मे, १९५७ पासून ही सवलत अमलांत येईल. सर्टिफिकिटें धारण करणारांना पैशाची नड लागली तर त्यांना सर्टिफिकिटें मोडून त्यांची रक्कम मुदतीच्या आंत घेण्याचें टाळतां यावें, ह्यासाठी ही सवलत आहे.

### सिलोन सरकारसाठी सेकंडहँड बसेस

लंडन ट्रॅन्सपोर्ट बोर्डानें चार वर्षें वापरलेल्या ६५ बसेस सिलोन सरकारला देऊं करण्यांत आल्या आहेत. सिलोन सरकार लवकरच तेथील बसवाहतुकीचें राष्ट्रीयीकरण करणार आहे त्यासाठी त्याला बसेस हव्या आहेत.

### काढीमोड केलेल्या राणीच्या पोषाकाची किंमत देण्यासाठी ५० लक्ष फ्रँक्सचा हुकूमनामा

राजा फरूकनें राणी नरिमनसाठी पॅरिस येथील एम्. डाउरकडून १९५२ मध्यें पोषाख करून घेतले, त्यांची किंमत त्यानें दिली नाहीं. २ मार्च, १९५५ रोजीं त्याचेवर ४८,२४,५८० फ्रँक्सचा हुकूमनामा झाला. त्यावर फरूकनें अपील केलें, परंतु खालच्या कोर्टाचा निवाडा अपीलकोर्टानें कायम केला आणि १,००,००० फ्रँक्स व्याजाखातर एम्. डाउरला देवविले. हे पोषाक फरूकनें राज्यत्याग करण्यापूर्वी दोन महिने त्याच्याकडे पोंचविण्यांत आले होते. राणी नरिमननें काढीमोड घेतलेला आहे.

### अमेरिकेंतून आणलेल्या कोंबडीच्या पिलांची आबाळ

अमेरिकेंतून आणलेल्या कोंबड्यांच्या ९०० पिलांपैकी १७५ पिलें नागपूर येथील सरकारी पोल्ट्री फार्ममध्यें मरण पावलीं. सूर्याच्या उजेडाच्या अभावामुळें त्यांना 'रिकेटस' झाली. अमेरिकेच्या तांत्रिक सहकार मंडळाचे तज्ज्ञ, डॉ. अर्ल मूर ह्यांनीं ह्या आबाळीबद्दल मध्यवर्ती सरकारकडे तक्रार केली आहे.

**राजस्थानसाठी कालवा**—राजस्थानचा उत्तर व वायव्य भाग पाण्याच्या अभावीं रुक्ष व रेताड आहे. ह्या भागाला पाणी पुरवठा करण्यासाठी सरकारनें एका कालव्याची योजना आखली आहे. पंजाबमधील सतलज नदीपासून कालव्याला पाण्याचा पुरवठा होईल. पंजाबमध्यें ११० मैल वाहून मग तो राजस्थानांत शिरेल. त्यामुळें ३४ लाख एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होईल.

**वॉरसा येथें तत्त्वज्ञांची परिषद**—वॉरसा येथें तत्त्वज्ञांची एक परिषद येत्या जुलै महिन्यांत भरविण्यांत येणार आहे. परिषदेला पौर्वात्य व पाश्चात्य देशांतील ६० तत्त्वज्ञ हजर रहातील असा अंदाज आहे. विचार व कृति ह्यांच्या परस्परसंबंधावर परिषदेंत चर्चा होईल.

**मंत्र्यांना आमंत्रणें देऊं नका**—केरळच्या कम्युनिस्ट पक्षाच्या चिटणिसांनीं एक पत्रक काढून लोकांना अशी विनंति केली आहे कीं, त्यांनीं निदान तीन महिनेपर्यंत कोणाहि मंत्र्याला सार्वजनिक समारंभाचीं आमंत्रणें देऊं नयेत. अशा आमंत्रणामुळें मंत्र्यांना आपलीं कामें नीट करतां येणार नाहींत, म्हणून ही विनंति करण्यांत आली आहे.

### तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची पूर्वतयारी

नियोजन मंडळानें सर्व राज्य सरकारांना पत्र पाठवून, तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत कोणती पाणी-पुरवठ्याची व वीज उत्पादनाचीं कामें समाविष्ट करावींत ह्याविषयीं प्राथमिक चौकशी सुरू करण्यास सांगितलें आहे. एका अनुभवी सुपरिंटेंडिंग इंजिनिअरकडे त्यांनीं हें काम सोपवावें, असेंहि नियोजन मंडळानें सुचविलें आहे. मोठी पाटबंधाऱ्यांचीं कामें पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनांत आहेत व तीं तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतहि चालू रहातील. तिसऱ्या योजनेंत हातीं घ्यावयाचीं नवीं कामें मध्यम आकाराचीं असावींत असें नियोजन मंडळाचें धोरण आहे. वीज उत्पादनाच्या योजना कोळसा खाणींपासून दूरच्या प्रदेशांतच हातीं घेतल्या जातील.

### सर अँथनी ईडनच्या शस्त्रक्रियेचा खर्च

माजी ब्रिटिश पंतप्रधान, सर अँथनी ईडन, ह्यांच्यावर बॉस्टन येथें शस्त्रक्रिया करण्यांत आली. त्यांच्यासाठी त्यांना अमेरिकेंत बराच खर्च येणार हें उघड आहे. दीर्घकाळ देशाची सेवा केलेल्या पंतप्रधानाला स्वतःच्या खिशांतून हा खर्च भागवावा लागणें त्यांचेवर अन्यायकारक आहे, असें ग्रेटब्रिटनमधील पुष्कळांना वाटतें. परंतु, आपल्या मित्रांनीं फंड उभारूं नये अशी सर अँथनी ईडन ह्यांची इच्छा आहे. माजी पंतप्रधान ह्या नात्यानें त्यांना दरसाल २,००० पौंड पेन्शन मिळतें.

### सुवेझ कालव्याबाबत पी. अँड ओ. प्रमुखाचें मत

पी. अँड ओ. स्टीम नॅव्हिगेशन कंपनीचे चेअरमन, सर विल्यम करी, ह्यांनीं कंपनीच्या वार्षिक सभेंतील आपल्या भाषणांत सांगितलें कीं, सुवेझ प्रश्न सोडविण्याचे बाबतींत युनायटेड नेशन्सवर आगबोट मालकांचा विश्वास नाहीं. "आपल्या ह्या मोठ्या देशाचें व त्याच्या शिपिंगचें हिताहित युनायटेड नेशन्सच्या हातीं असावें, ही दुर्दैवाची गोष्ट आहे; कारण मूळ आक्रमण २६ जुलै रोजीं इजिप्तनें कालवा बळकावून केलें, ह्याचा युनायटेड नेशन्सच्या सभासदांना विसर पडला आहे. कालव्याची व्यवस्था आंतरराष्ट्रीय संघटनेस जबाबदार असल्याखेरीज आणि ह्या संघटनेंत कालवा वापरणारांना पुरेसें प्रतिनिधित्व असल्याखेरीज, कालव्याच्या ह्यापुढील व्यवस्थेबद्दल साशंकता नाहींशी होणार नाहीं. पूर्व व पश्चिम ह्यांना जोडणारा हा व्यापारी महत्त्वाचा मार्ग एका सरकारच्या नियंत्रणाखालीं कधींच रहाता कामा नये." असेंहि ते म्हणाले.

### लंडन ते कलकत्ता बसचा प्रवास

२१ इंग्रज १७ एप्रिल रोजीं लंडनहून कलकत्ता येथें येण्यासाठी एका बसमधून निघाले. ह्या २१ उतारूंत १० पुरुष व ११ स्त्रिया आहेत. बसला 'दि इंडियामन' असें नांव देण्यांत आलें असून, तिचे दोन्ही बाजूवर बसच्या प्रवासाचा मार्ग (टुरिन, व्हेनिस, बेलग्रेड, इस्तंबुल, तेहेरान, केट्टा, लाहोर, दिल्ली, कलकत्ता) रंगविला आहे. प्रवासाचें भाडें ८५ पौंड प्रत्येकानें भरलें आहे. रात्रींच्या वेळीं सर्व प्रवासी तंबूंत निजतात. दर तीन महिन्यांतून एकदां ही बस सर्व्हिस चालू ठेवण्याचा योजकाचा बेत आहे.

**अन्नपदार्थ दूषित झाले**—गेल्या कांहीं दिवसांत रशिआंत करण्यांत आलेल्या अणुस्फोटामुळें जपानमधील भाजीपाला व फळें दूषित झाल्याचा इशारा देण्यांत आला आहे. त्यामुळें हे पदार्थ ताजे घेण्याऐवजीं डबाबंद घेण्याची वृत्ति वाढली आहे. अर्थात् डबाबंद पदार्थांच्या किंमती वाढल्या आहेत.


खर्चात बचत करा व पैसा शिलकीत टाका

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

जनता बचत योजना

व्याज : २½ टक्के



शाखा: फोर्ट, दादर, माहिम, पुणें, बेळगांव.

कण आणि क्षण

ह्या अत्यंत लोकप्रिय (दोन वर्षांत दोन मराठी व दोन गुजराती आवृत्त्या) पुस्तकाचे कर्ते श्री. श्री. वा. काळे संपादक, "अर्थ" ह्यांचें

पुढे पाऊल

चित्ताकर्षक विवेचन असलेल्या मार्गदर्शक लघुनिबंधांचा संग्रह.

पृ. सं. १३१] आर्यभूषण प्रेस, पुणें ४. [किंमत १ रु.

कण आणि क्षण

(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)

लेखकः—श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

मराठी दुसरी आवृत्ति] [किं. १ रु. ८ आ.



किर्लोस्कर

इलेक्ट्रिक पंपिंग सेट

यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाळ टिकाऊ.

आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकरित्या काम करीत आहेत. सविस्तर माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा.

## चांदीचें उत्पादन

( आंकडे दशलक्ष टनांचे आहेत. )

| | १९५२ | १९५३ | १९५४ | १९५५ | १९५६ | १९५५ चे मानानें १९५६ मध्यें %वाढ (+) किंवा घट (−) |
|---|---|---|---|---|---|---|
| मेक्सिको ... | ५०·४ | ४७·९ | ३९·९ | ४८·० | ४४·० | − ८·३ |
| अमेरिका ... | ३९·८ | ३७·७ | ३५·६ | ३६·५ | ३७·५ | + २·७ |
| कॅनडा ... | २५·२ | २८·३ | ३१·१ | २७·९ | २७ ५ | − १·४ |
| पेरू ... | १८·४ | १९·७ | २०·४ | २३·० | २३·० | — |
| बोलिव्हिया ... | ७·१ | ६·१ | ५·० | ५·९ | ७·० | +१८·६ |
| इतर द. व मध्य अमेरिकन देश | ७·४ | ९·४ | ७·७ | ६·१ | ६·० | − १·६ |
| एकूण प. गोलार्ध ... | १४३·३ | १४९·१ | १३९·७ | १४७·४ | १४५·० | |
| इतर ... | ६७·० | ७२·१ | ७३·३ | ७४·१ | ८५·० | +१४·७ |
| जागतिक उत्पादन ... | २१५·३ | २२१·२ | २१३·० | २२१·५ | २३०·० | + ३·८ |

## मुंबई राज्याची दुसरी पंचवार्षिक योजना

### १९५७–५८ चा कार्यक्रम : मुंबई सरकारची पुस्तिका

पुनर्रचित मुंबई राज्यांत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेखाली १९५७–५८ सालीं विकासाच्या निरनिराळया क्षेत्रांमध्यें ७२·८ कोटी रुपये खर्चाचे कार्यक्रम हातीं घेण्यांत येतील.

नव्या राज्याच्या पंचवार्षिक योजनेचा एकूण खर्च ३५०·१३ कोटी रु. असून १९५७–५८ सालीं हातीं घ्यावयाच्या कार्यक्रमाबाबत नियोजन मंडळाशीं विचारविनिमय करून तो ठरविण्यांत आला आहे. या कार्यक्रमाची माहिती मुंबई सरकारच्या प्रसिद्धि खात्यातर्फे प्रसिद्ध झालेल्या, "१९५७-५८ सालच्या विकास कार्यक्रमांचा मसुदा" या नांवाच्या पुस्तिकेंत देण्यांत आली आहे. विकासाच्या प्रत्येक क्षेत्रांत कोणत्या कामांना अग्रक्रम द्यावयाचा हें तर या पुस्तिकेंत सांगण्यांत आलेंच आहे, पण विकासाच्या प्रत्येक क्षेत्रांत किती खर्च करावयाचा याचें व त्या त्या क्षेत्रांत साधावयाचें इष्टांक यांचे आंकडेहि देण्यांत आले आहेत.

१९५७–५८ सालीं एकूण ७२·८ कोटी रुपये खर्च येणार असून त्याची विषयवार विभागणी पुढील प्रमाणें आहे:—२० कोटी रुपये शेतकी आणि समाज विकास, २६,९६ कोटी रुपये पाटबंधारे आणि वीज, २·६३ कोटी रुपये उद्योगधंदे व खाणी, ९·१८ कोटी रुपये वाहतूक आणि दळणवळण, १५·७५ कोटी रुपये शिक्षण, आरोग्य, घर बांधकाम वगैरे सारख्या सामाजिक सुखसोयी, आणि १·२८ कोटी रुपये कला व संस्कृतीला उत्तेजन, राष्ट्रीय व प्रादेशिक भाषांचा विकास व इतर संकीर्ण बाबी.

या पुस्तिकेची किंमत प्रतीस चार आणे असून मुंबईत या पुस्तिका डायरेक्टोरेट ऑफ् पब्लिसिटी, सचिवालय येथें व गव्हर्मेंट बुक डेपो, इन्स्टिट्यूट ऑफ् सायन्स बिल्डिंग, येथें मिळूं शकतील व इतरत्र जिल्हा व प्रादेशिक प्रसिद्धि अधिकाऱ्यांकडे मिळूं शकतील.

**पीत नदीवर प्रचंड धरण**—मध्य चीनमध्यें एका डोंगराळ भागाचा फायदा घेऊन पीत नदीवर प्रचंड धरण बांधण्याच्या कामास प्रारंभ झाला आहे. पीत नदी ही चीनमधील अतिशय बिकट समस्या आहे. नदीला येणाऱ्या पुरांत आजवर लक्षावधि माणसें मृत्यू पावलीं आहेत.

## छोटे उद्योगधंदे आणि औद्योगिक सहकारी संस्था ह्यांचसाठी नवीन खातें

पुणें येथील मुंबई राज्य सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रारांच्या नियंत्रणाखाली असलेल्या सहकारी खात्याच्या औद्योगिक सहकारी संस्था आणि ग्रामोद्योग हा विभाग वेगळा काढून छोटे उद्योगधंदे आणि औद्योगिक सहकारी संस्थांचें एक नवीन खातें बनविण्यांत आलें आहे. नवीन मुंबई राज्याची स्थापना झाल्यापासून औद्योगिक सहकारी संस्थांच्या आणि ग्रामोद्योगाच्या कार्यक्षेत्रांत फार वाढ झाल्यामुळें नवीन खातें बनविणें आवश्यक झालें.

जंगल–कामगारांच्या संस्था आणि लेबर कॉन्ट्रॅक्ट सोसायट्या यापुढें छोटे उद्योगधंदे आणि औद्योगिक सहकारी खात्यामार्फत रजिस्टर केल्या जातील आणि त्यांच्यावर देखरेख त्याच खात्याकडून ठेवली जाईल. परंतु प्रोसेसिंग सोसायट्या मात्र सहकारी खात्याच्या नियंत्रणाखालीच रहातील. को–ऑपरेटिव्ह स्पिनिंग मिल, या छोट्या उद्योगधंद्याचे डायरेक्टर आणि औद्योगिक सहकारी संस्थाचे ॲडिशनल रजिस्ट्रार यांच्या नियंत्रणाखाली रहातील.

औद्योगिक सहकारी संस्था व ग्रामोद्योग यांच्या जॉइंट रजिस्ट्रारला "छोट्या उद्योगधंद्यांचे डायरेक्टर आणि औद्योगिक सहकारी संस्थांचे ॲडिशनल रजिस्ट्रार" असें संबोधण्यांत येईल आणि त्यांना नवीन खात्याचे प्रमुख समजण्यांत येईल. त्याचप्रमाणें पूर्वीच्या औद्योगिक सहकारी संस्था व ग्रामोद्योग विभागांतील अधिकारीहि नवीन खात्यांतील अधिकारीच रहातील. छोट्या उद्योगधंद्याचे डायरेक्टर आणि औद्योगिक सहकारी संस्थांचे ॲडिशनल रजिस्ट्रार यांना खातेप्रमुखांचे सर्व अधिकार राहतील. त्याचप्रमाणें सध्यांच्या औद्योगिक सहकारी संस्थांच्या आणि ग्रामोद्योगाच्या डेप्युटी रजिस्ट्रारकडून आणि औद्योगिक सहकारी संस्था व ग्रामोद्योग यांचें असिस्टंट रजिस्ट्रारकडून चालविले जाणारे सर्व अधिकार अनुक्रमें छोट्या उद्योगधंद्यांचे डेप्युटी डायरेक्टर व औद्योगिक सहकारी संस्थांचे डेप्युटी रजिस्ट्रार आणि छोट्या उद्योगधंद्यांचे असिस्टंट डायरेक्टर व औद्योगिक सहकारी संस्थांचे असिस्टंट रजिस्ट्रार हे चालवतील.

### रुपयाच्या नव्या नोटा

भारत सरकारच्या एक रुपयाच्या नोटांवर यापुढें दशमान पद्धतीमधील रुपयाच्या नाण्याचें चित्र छापण्यांत येणार आहे. बाकी दुसरा कोणताहि बदल केला जाणार नाहीं.

## सुखी वैवाहिक जीवनासाठी मार्गदर्शन

ब्रिटिश मेडिकल असोसिएशन ह्या जगांतील ७०,००० डॉक्टरांच्या प्रातिनिधिक संस्थेनें सुखी वैवाहिक जीवनासंबंधीं सूचना देणारी एक ३६ पानी पुस्तिका प्रसिद्ध केली. डॉ. हार्वे फ्रॅंक हे पुस्तिकेच्या प्रस्तावनेंत म्हणतात; "मधुचंद्र ही प्रेम करण्याच्या शिक्षणाची केवळ पहिली पायरी आहे; जन्मभर सुखानें विवाहित रहाणें, ही एक मोठी कला आहे. वैवाहिक जीवनाला आवश्यक असें शरीरधर्मविषयक ज्ञान असणें तें नसण्यापेक्षा उत्तम; पण ह्या ज्ञानानें केवळ भागणार नाहीं. नाजूक भावनेनें आणि समजूतदारपणें त्याचा उपयोग केला पाहिजे. प्राणिशास्त्राचा व्यावहारिक उपयोग करण्यापुरतेंच स्त्री–पुरुष संबंधाकडे पहातां कामा नये; प्रेमाची पूर्तता करण्याची ती सर्वोच्च पायरी आहे." डॉ. ॲशले मॉंटेग्यू हे आपल्या लेखांत म्हणतात, "स्त्रियांना वाढत्या प्रमाणांत मिळणाऱ्या राजकीय, कायदेविषयक व सामाजिक स्वातंत्र्यामुळें विवाहसंस्थेवर अनुकूल परिणाम झाला आहे. नाजूक भावनांची आवश्यकता निर्विवाद आहे. परंतु आपल्या काळांतील फारच थोड्या पुरुषांना पुरेशा नाजूकपणें वागणें साधतें; त्यांत सातत्य रहाण्याची मग गोष्टच कशाला?" डॉ. जी. के. सेलबर्न हे लिहितात, "वैवाहिक जीवनांतील दुही थांबविण्याला आरामशीर डबलबेड बरीच मदत करूं शकतो. एकाच पलंगावर पति–पत्नी निजले म्हणजे त्यांना वाटणारी ममता ते सहज व्यक्त करूं शकतात; परंतु ते दूरदूर निजले म्हणजे ममता व्यक्त करण्याची त्यांची संवयच नष्ट होते आणि पुढें ममता वाटेनाशीहि होते"

---

### उपमंत्र्यांना प्रवासांत नातेवाइकाची सोबत

भारत सरकारच्या मंत्र्यांना आपल्या बरोबर प्रवासांत एक नातेवाईक सरकारी खर्चानें नेतां येतो. ही सवलत आतां उप-मंत्र्यांनाहि देण्यांत आली आहे. १३ एप्रिल, १९५७ च्या गॅझिटांत त्याप्रमाणें नियम जाहीर करण्यांत आला असून, तो नियम ७ डिसेंबर, १९५४ पासून अंमलांत आला असें समजलें जावें, अशी त्यांत तरतूद आहे.

---

### कर्नाटक बॅंकिंग ॲंड ट्रेडिंग कं. लि., कल्याणपूर

वरील बॅंकेला लायसेन्स देण्यास रिझर्व्ह बॅंकेचा नकार तिला १२ एप्रिल रोजीं कळविण्यांत आला.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

* दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बॅंक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बॅंक )

हेड ऑफिस :–१० बुधवार पेठ, पुणें २ ★ मुंबई शाखा :–८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
प्रेसिडेन्सी बॅंक बिल्डिंग, (फोन २७६३) ★ कॉमनवेल्थ बिल्डिंग, (फोन ३०४०८)

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३३,१३५
खेळतें भांडवल ... ... रु. ६२,००,०००

उपाध्यक्ष श्री. वा. ग. बापट

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज २॥ टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बॅंकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी. मॅनेजर

## दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

— शाखा —

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,५०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

—सर्व प्रकारचे बँकिंग-व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन

श्री. देवेंद्र आपया मंगाज कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.

## बँक ऑफ पूना लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

—मुख्य कचेरी : ४५५ रविवार, पुणें २.—

—शाखा—

( १ ) ३६१ सदाशिव, पुणें.
( २ ) ५४ डेक्कन जिमखाना, पुणें ४.
( ३ ) सोलापूर. ( ४ ) सांगली.

—: व्याजाचे दर :—

चालू ठेव—अर्धा टक्का. सेव्हिंग्ज—दोन टक्के.
१२ महिन्यांच्या पुढें मुदतीच्या ठेवीवर तीन टक्के व्याज.

★ सांगली शाखा व मुख्य ऑफिसमध्यें मूल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याकरितां अल्प भाड्यानें लॉकर मिळतील.

## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३५,२३,७०० | |
| मुंबई सरकारतर्फे | रु. २६,००,००० | |
| | रु. | ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ६१,८३,९०० |
| ठेवी | रु. | १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,२५,२४,००० |

### १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखा:—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी, २४ बार्शी.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,४६,००० |
| ठेवी | रु. | १,०५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५२ पासून सुरू आहे. ता. ११९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.